डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

कुलसचिव e-mail : registrar@pdkv.ac.in दूरध्वनी : ०७२४-२२५८३७२

वाचा: कार्यासन अधिकारी, कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण १५२६/प्र.क्र.१३६/६-अे, दि. १७/०६/२०२६

परिपत्रक

क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक-पा.अधिवेशन/ 1110/२०२६ दिनांक : 22/०६/२०२६

महाराष्ट्र विधानमंडळाचे व्दीतीय (पावसाळी) अधिवेशन सन २०२६, दिनांक २२/०६/२०२६ पासून मुंबई या ठिकाणी सुरु होत आहे. अधिवेशन कालावधीत दिनांक २२/०६/२०२६ ते अधिवेशन संपेपर्यंतच्या कालावधीत सुट्टीच्या दिवशी देखील अधिवेशन सुरु राहणार आहे. सदर अधिवेशना दरम्यान राज्यातील कृषि विद्यापीठांशी निगडीत उपस्थित होणाऱ्या विधानमंडळ आयुधांच्या अनुषंगाने मा. मंत्री (कृषी) व मा. राज्यमंत्री (कृषी) यांना तातडीने माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. त्याअनुषंगाने विद्यापीठातील सर्व कार्यालये नियमितपणे तसेच सुटीचे दिवशी सुध्दा सुरु ठेवण्यात यावी, असे शासनातर्फे निर्देश देण्यात आले आहे.

करीता डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत असलेले सर्व नियंत्रण अधिकारी/ कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, अधिवेशन कालावधीत तसेच यादरम्यान सुट्टीच्या दिवशी विद्यापीठातील सर्व कार्यालये नियमितपणे सुरु राहतील. तसेच कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांची अपरिहार्य कारण व वैद्यकीय कारणाव्यतिरीक्त इतर कोणतीही रजा मंजुर करण्यात येवू नये. सदर सूचनांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

मा. कुलगुरु महोदयांचे मंजुरीने निर्गमित.

(प्रिती रोडगे)
कुलसचिव
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

प्रतिलीपी :

१) मा. कार्यासन अधिकारी, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय (विस्तार), दालन क्रमांक ५३९, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.
२) मा. सहसंचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षणव व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे-०७.
३) संचालक (सर्व)
४) अधिष्ठाता (सर्व)
५) सहयोगी अधिष्ठाता (सर्व)
६) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व)
७) कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व)
८) प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय (सर्व)
९) प्रभारी अधिकारी (सर्व)
१०) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष(ARIS Cell) यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.
११) विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व)
१२) विद्यापीठ नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी/ विद्यार्थी कल्याण अधिकारी

(कृ.मा.पाहा)

८।।

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मंत्रालय (विस्तार) दालन क्रमांक ५३३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०२५४३७ email : desk6a.agri-mh@mah.gov.in
क्रमांक : संकीर्ण १५२६/ प्र.क्र.१३६/६-अे. दिनांक : १७ जून, २०२६.

प्रति,

महासंचालक
महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,
पुणे.

विषय :- महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२६ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनासाठी जबाबदार अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२६ चे द्वितीय (पावसाळी), अधिवेशन सोमवार, दि.२२.०६.२०२६ पासून विधानभवन, मुंबई येथे सुरू होत आहे. सदर अधिवेशना दरम्यान राज्यातील कृषि विद्यापीठांशी निगडीत उपस्थित होणाऱ्या विधानमंडळ आयुधांच्या अनुषंगाने मा. मंत्री (कृषि) व मा. राज्यमंत्री (कृषि) यांना तातडीने माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. तसेच, त्याअनुषंगाने मा. मंत्री (कृषि) व मा. राज्यमंत्री (कृषि) यांच्याकडे आयोजित होणाऱ्या पूर्वचर्चेसाठी संबंधित कृषि विद्यापीठाचे आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन व परिषद, पुणे येथील जाणकार अधिकारी हजर असावे लागतात.

२. वरील पार्श्वभूमीवर आपणास विनंती करण्यात येते की, अधिवेशनाच्या संपूर्ण कालावधीसाठी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन व परिषद, पुणे व चारही कृषि विद्यापीठातील विषयाची पूर्ण माहिती असलेल्या सक्षम व जबाबदार, प्रशासकीय तसेच, विधानमंडळ कामकाजाचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी व याबाबत शासनास तात्काळ अवगत करण्यात यावे.

३. अधिवेशन कालावधीत कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येवू नये. तसेच, सदर अधिवेशन कालावधीत सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी आवश्यकता भासल्यास, कृषि विद्यापीठे आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन व परिषद, पुणे येथील संबंधितांना कार्यालयात उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपला,

(रोहिदास खोकले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१.कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
२.कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
३.कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४.कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला